जा.क्र. १९१३ /२०२५
जिल्हा न्यायालय, पंढरपूर
दिनांक :- १५ /०९/२०२५
१६

## —: जाहीर निविदा :—

जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे आवश्यकते नुसार मुळ अभिलेखांच्या छायांकीत प्रती (झेरॉक्स) काढणेकरीता पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

## —: नियम व अटी :—

१. पुरवठादार यांनी, सदर जाहीर निविदा प्रसिध्द झाल्यापासून ते दिनांक २९.०९.२०२५ पर्यंत जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे ''अधिक्षक कार्यालयात'' मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर यांच्या नावाने बंद लखोट्यात दरपत्रक सादर करावे. लखोट्यावर '' छायांकीत प्रती पुरवीणे करीता दरपत्रक'' असे नमुद करण्यात यावे.
२. मुदती नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
३. A-4 साईज पेपरसाठी छायांकीत प्रतींचा दर, एका बाजुने व दोन बाजुने स्वतंत्र व स्पष्ट नमुद करावा. इतर प्रकारे दर नमूद केल्यास दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही व त्यास पुरवठादार जबाबदार राहतील. तसेच त्याबाबत नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
४. पुरवठादार, सर्व प्रकारच्या सेवा, झेरॉक्स मशीन, स्पेअर—पार्ट, झेरॉक्स पेपर, झेरॉक्स ऑपरेटर, विज बिल विना मुल्य पुरवतील.
५. दरपत्रका प्रमाणे बिलाची देय रक्कम दरमहा, रेकॉड किपर यांचा अहवाल व सहा. अधिक्षक यांचे छाननी नंतर अदा करणेत येईल. दर महाचे बिल रक्कमेबाबत सहा. अधिक्षक यांचा निर्णय अंतीम असेल.
६. झेरॉक्स मशिन कोणत्याही परिस्थितीत निष्क्रिय राहु नये.
७. झेरॉक्स मशिन खराब झाल्यास पर्यायी झेरॉक्स मशिन पुरवठादार तयार ठेवील.
८. बिल सादर केल्यानंतर एक महिन्याच्या आत शक्य तितके बिलाचे पेमेंट केले जाईल.
९. पुरवठादार एक महिना अगोदर नोटीस देवून करार रद्द करु शकतील.
१०. झॅरॉक्स रुम करीताचे, सब मिटरप्रमाणे विद्युत देयक पुरवठादार देय दिनांकाच्या मुदती मध्ये अदा करतील. विद्युत वितरण कंपनी कडून दंड आकारल्यास पुरवठादार अदा करतील.
११. गैरवर्तन किंवा बेकायदेशीर कृत्य अढळुन आल्यास परवाना करार रद्द ठरु शकतो.
१२. परवाना करार, करार दिनांका पासून तीन (३) वर्षासाठी असेल.
१३. दरपत्रक मंजुर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ''मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर'' यांनी स्वत: कडे राखून ठेवला आहे.

आदेशावरुन,

क.लि. सहा. अधिक्षक अधिक्षक
**जिल्हा न्यायालय, पंढरपूर**

District Court Pandharpur
जिल्हा न्यायालय, पंढरपूर
सत्यमेव जयते

प्रत.
१. जिल्हा न्यायालय, सोलापूर अधिकृत संकेतस्थळ.
२. जिल्हा न्यायालय, पंढरपूर नोटीस बोर्ड.